**कृपया प्रसिद्धीसाठी** **19 जून 2014**

**भारतीय जनता पार्टीचे नेते श्री.राम नाईक आणि भाजपा मुंबईचे अध्यक्ष आमदार श्री. आशिष शेलार यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत गुरुवार, 19 जून 2014 रोजी मुंबईत वितरीत केलेले निवेदन.**

***मतदार याद्या सुधारण्याची पध्दत सोपी होणार***

**मुंबई, गुरुवार :** विधानसभा निवडणुकीसाठी मतदार याद्यांच्या सुधार कार्यक्रमात नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ज्या मतदारांची नावे गाळली गेली होती, त्यांनी पूर्वीच्या मतदार यादीतील यादी क्रमांक आणि अनुक्रमांक किंवा निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार ओळख पत्रातील क्रमांक लिहिल्यास त्यांना फॉर्म 6 भरताना जन्माचा, निवासाचा किंवा अन्य कोणताही पुरावा द्यावा लागणार नाही. तसेच ज्या मतदारांच्या इमारती पुनर्विकासात गेल्यामुळे मतदारांची नावे वगळण्यात आली त्यांची नावेही पुन्हा मतदार याद्यात समाविष्ट करण्यासाठी योग्य निर्णय तातडीने घेण्यात येईल असे स्पष्ट आश्वासन निवडणूक आयोगाने भारतीय जनता पार्टीचे नेते श्री.राम नाईक आणि भाजपा मुंबईचे अध्यक्ष आमदार श्री.आशिष शेलार यांना बुधवारी दिल्ली येथे झालेल्या बैठकीत दिले आहे. त्या बैठकीत माजी उपमहापौर श्री.अरुण देवही हजर होते.

याशिवाय लोकसभा निवडणुकीत आयोगाच्यावतीने मतदारांना देण्यात आलेल्या ‘मतदार चिठ्ठ्या’ मतदानापूर्वी पाच दिवस वाटण्यास सुरुवात केल्याने सर्व मतदारांना मिळू शकल्या नव्हत्या. त्या आगामी विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर ताबडतोब वाटायला घेतल्या जातील म्हणजे वाटपात गोंधळ होणार नाही असे आश्वासनही निवडणूक आयोगाने दिले आहे.

निवडणूक आयोगाकडे झालेल्या बैठकीत मुख्य निवडणूक आयुक्त श्री. व्ही.एस.संपत तसेच आयुक्त श्री.एच.एस.ब्रह्मा व डॉ. नसिम झैदी यांच्यासह निवडणूक आयोगाचे अन्य वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते. मतदार याद्या घरोघरी जाऊन जनगणनेप्रमाणे नव्याने तयार कराव्यात या मागणीबद्दल विधानसभा निवडणुकीपर्यंत हे काम पूर्ण होऊ शकणार नाही असे आयोगाने स्पष्ट केले. या शिवाय मतदार याद्यामध्ये 100 टक्के छायचित्र समाविष्ट करण्याचे प्रयत्न केले जातील म्हणजे बोगस मतदानावरही नियंत्रण येईल असे आश्वासनही आयोगाने दिले.

आयोगाने दिलेली आश्वासने अंमलात आणण्यासाठी लेखी आदेश महाराष्ट्र राज्याच्या मुख्य निवडणूक अधिका-यांना आठवड्याच्या आत दिले जातील. तसेच त्याप्रमाणे जाहिरातीही देण्यात येतील असे आयोगाने आश्वासन दिले आहे. ज्या मतदारांची नावे लोकसभा निवडणुकीच्या मतदार याद्यात गाळली गेली होती, त्यांनी आपली नावे नोंदविण्याचा प्रयत्न करावा असे आवाहनही श्री. राम नाईक आणि श्री. आशिष शेलार यांनी केले आहे.

**(कार्यालय सचिव)**